

# फिनोलेक्स इंडस्ट्रीज, मुकुल माधव फाऊंडेशनचे दायित्व

## देवरुख मातृमंदिर संस्थेला पाच ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर



रत्नागिरी, दि. २९ (प्रतिनिधी) - फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशनने देवरुख मातृमंदिर संस्थेला ५ ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर (१० लिटर प्रति मिनिट ऑपरेटिंग लोड) देणगी स्वरूपात दिले आहेत.

सध्या देशभरात कोविड-१९ रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेऊन त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी गावागावांत कोविड सेंटर चालू करण्यात आली आहेत. याचाच एक भाग म्हणून चिपळूण-संगमेश्वरचे आमदार शेखर निकम यांनी फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशनकडे देवरुख मातृमंदिर संस्थेला वैद्यकीय उपकरणांची मागणी केली होती. ही मागणी मुकुल माधव फाऊंडेशनच्या विश्वस्थ रितू प्रकाश छाब्रिया यांनी त्वरित मान्य करून २८ मे रोजी देवरुख मातृमंदिर कोविड सेंटर यांच्याकडे ५ ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर सुपूर्त केले. या कार्यक्रमास चिपळूण-संगमेश्वरचे आमदार शेखर निकम, मातृमंदिर ट्रस्टचे सदस्य व सामाजिक कार्यकर्ते अभिजित हेगशेटये, तहसीलदार थोरात, बी.डी.ओ. रेवणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी नगर परिषद, देवरुख श्वालाजी लोंडे आणि मातृ मंदिराचे विश्वस्त व फिनोलेक्स व मुकुल माधव फाऊंडेशनचे पदाधिकारी उपस्थित होते.